रोम-९-जन-४५०-८-९४-१५००.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## प रि प त्र क

क्र. एमआरटी / ८२११ दिनांक १-९-९४

विषय – महापालिका कर्मचा-यांची प्रत्येक तीन वर्षानंतर बदली करण्याबाबत.

संदर्भ – १. दि. १७-७-१९८५ चे परिपत्रक क्रमांक एमओएम/५६८२.
( १९८५-८६ चा क्र. एमसी/२७)
२. दि. १९-९-१९८५ चे परिपत्रक क्रमांक एमओएम/६८८४
( १९८५-८६ चा क्र. एमसी/५०)

---

उपरोक्त संदर्भित परिपत्रकांतील आदेशानुसार, खातेप्रमुख आणि विभाग अधिकार यांना ३ वर्ष किंवा अधिक कालावधीकरिता एकाच विभागात काम करणा-या कर्मचा-यांचे अन्य विभागांत बदली करण्याची आणि महापालिका प्रशासनाच्या कामकाजाची त्यांना सर्वकष माहिती होण्याकरिता एकूण कर्मचा-यांपैकी २५ % कर्मचा-यांची प्रत्येक तीन वर्षानंतर बदली करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली आहे.

सदर आदेशांचे खातेप्रमुख / विभाग अधिकारी यांच्याकडून एकसूत्रतेने पालन केले जात नाही आणि नियंत्रण अधिका-यांनी बदलीचे/ बढतीचे आदेश देऊनही, कार्यालयाच्या सोयीच्या सबबीखाली संबंधित कर्मचा-यांना खातेप्रमुख / विभाग अधिकारी त्याच पदावर ठेवून घेतात असे आढळून आले आहे.

कार्यालयाच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या अशा त-हेच्या कार्यालयीन व्यवस्थांमु अनेक समस्या निर्माण होतात आणि नियंत्रण अधिका-यांपुढे अधिक पेच उभे रहातात.

म्हणून, अशा समस्या टाळण्याच्या दृष्टीने असे आदेश देण्यात येत आहेत की, यापुढे नियंत्रण अधिका-यांनी दिलेल्या बदली/ बढतीच्या आदेशांचे पालन विनाविलंब केले जावे आणि एखादी विशिष्ट अडचण असल्यास ती संबंधित विभाग /परिमंडळाचे अति. महानगरपालिका आयुक्त यांच्या निदर्शनास आणून द्यावी आणि त्यांच्या परवानगीशिवाय खाते प्रमुख / विभाग अधिकारी यांनी, ज्या कर्मचा-यांच्या बदली/

बदलीचे आदेश देण्यात आले असतील त्यांना कोणत्याही परिस्थितीत त्याच पदावर ठेवून घेऊ नये·

सही/-
विवेक नाडकर्णी
२-८-१९९४
कर्मचारी अधिकारी

सही/-
अरविन्द मांडुस्कर
४-८-१९९४
उप-आयुक्त(कर्मचारी)

सही/-
सुधा भावे
७-८-९४
अति·आयुक्त(बीएच)

सही/-
कि·श·बारोई
१०-८-९४
अति·आयुक्त(बी)

श·गं·काळे,
१०-८-९४
महापालिका आयुक्त

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्र·एमआरटी/८२११
दिनांक १-९-१९९४

एमसी/
१९९४-९५

प्रत --------------------------------------------------------

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना·

उप कर्मचारी अधिकारी २/९/९५
(आस्थापना)